# <u>जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.</u>

## <u>जाहीर निविदा</u>

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयातील चतुर्थश्रेणी पुरुष कर्मचा–यांना पांढरे टेरिकॉटचे सुटिंग व शर्टिंगचे कापड, महिला कर्मचा–यांकरिता फिकट निळया रंगाची काळी किनार असलेली साडी व आकाशी ब्लाऊज पीस तसेच सफाई कामगार (स्वीपर) करीता नेव्ही ब्ल्यु रंगाचे कापड असे प्रत्येक चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचेकरीता प्रत्येकी तीन गणवेश याप्रमाणे अंदाजे 140 पुरुष व 20 महिला असे एकुण 160 कर्मचा–यांचे गणवेशाचे कापड खरेदी करावयाचे आहेत. त्याकरिता या कार्यालयाकडून याद्वारे जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे.

1. प्रत्येक चतुर्थ श्रेणी शिपाई पुरुष कर्मचारी यांना 03 पॅंट साठी 3.90 मीटर (67 टक्के पॉलिस्टर व 33 टक्के व्हिसकॉस) व शर्ट करीता 06 मीटर (80 टक्के पॉलिस्टर व 20 टक्के व्हिसकॉस) प्रमाणे पॅन्टसाठी रक्कम रुपये 350/– व शर्टसाठी रक्कम रुपये 150/– पावेतो रकमेचे कापड लागेल.

2. प्रत्येक चतुर्थ श्रेणी महिला शिपाई कर्मचारी यांना 03 साडया फिकट निळया रंगाची काळी किनार असलेली (67 टक्के पॉलिस्टर व 33 टक्के कॉटन) (सहावारी फिकट निळा रंग काळया किनारीसह) व आकाशी ब्लाउज पीस (80 टक्के पॉलिस्टर व 20 टक्के व्हिसकॉस) प्रमाणे साडीसाठी रक्कम रुपये 400/– व ब्लाउजसाठी रक्कम रुपये 150/– पावेतो रकमेचे लागेल.

3. प्रत्येक चतुर्थ श्रेणी पुरुष सफाईगार कर्मचारी यांना नेव्ही ब्ल्यु रंगाचे 03 पॅन्टसाठी 03 मीटर व शर्टसाठी 06 मीटर (67 टक्के पॉलिस्टर व 33 टक्के व्हिसकॉस) प्रमाणे पॅन्ट व शर्ट साठी रक्कम रुपये 350/–पावेतो रकमेचे कापड लागेल.

4. चतुर्थ श्रेणी पुरुष कर्मचा–यांना लागणारे कापड पुरवठादार यांनी नमुद मापाप्रमाणे कापुन स्वखर्चाने जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथे पुरवठा करावा लागेल.

5. ज्या पुरवठादारांना स्वारस्य असेल त्यांनी कापडाच्या नमुन्यासह दरपत्रके बंद लिफाफ्यात म.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या <u>नावाने पाकिटावर "गणवेषाचे कापडाचे दरपत्रक व नमुना</u> " असे नमुद करुन पाकीटे म.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 येथे दिनांक 31/07/2024 सायंकाळी 06.00 वाजेपावेतो कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून द्यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

6. कापडाचा पुरवठा करतांना डिलेव्हरी चलन देण्यात यावे.

7. गणवेषाच्या कापडाचे एकत्रित उधारीचे देयक तीन प्रतित मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने सादर करण्यात यावे.

8. एकुण प्राप्त झालेले कापडाचे नमुने व दरपत्रके दिनांक 01/08/2024 रोजी सकाळी 10.30 वाजता म. जिल्हा व सत्र न्यायाधीश–1, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

## <u>सर्वसाधारण अटी</u>

1. ज्या पुरवठादाराचे दरपत्रक स्विकृत केले जातील त्यांनी पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर गणवेषाचे कापडाचा जास्तीत जास्त 15 दिवसांचे आत पुरवठा करावा. सदरील कापडाचा दर्जा स्विकृत केलेला उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा <u>Genuine (Original)</u> असावा नसल्यास कापडाचा पुरवठा स्विकारला जाणार नाही.

2. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

3. सदरील काम संपुर्ण झाल्यावर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.

4. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्सचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदी प्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल. तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस.कपात करण्यांत येईल.

5. उपरोक्त कापड खरेदी अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात करण्याचे अधिकार म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त गणवेषाचे कापड उधारीवर करावयाचे आहेत. तसेच सदर बिलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल.

6. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रके उघडणेत येतील.

7. दरपत्रकातील दर दिनांक 31/12/2024 अखेर पावेतो कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरवठा केला जाईल त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

8. गणवेषाच्या कापडाचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

म.जा.क./रोखशाखा/3e67/2024.
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक : 22/07/2024.

प्र.प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव.

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता सस्नेह सादर :</u>

1. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,, जळगांव.
2. म.मुख्य न्यायदंडाधिकारी, जळगांव.
3. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
4. म.तहसिलदार,जळगांव.
5. जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
6. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या (संकेतस्थळावर).

प्र.प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव.